


मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३४८४२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक २२ जानेवारी २०२४ । पान १


# हृदयात राम; हाताला काम, हेच हिंदुत्व : आदित्य ठाकरे

## जिल्ह्याजिल्ह्यात वाद निर्माण करणे, हे भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व आहे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
'हृदयात राम आणि हाताला काम', 'प्राण जाये पर, वचन न जाये' असे आमचे हिंदुत्व आहे,'' असा नारा युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी रविवारी दिला. धर्माधर्मात, जातीजातीत, जिल्ह्याजिल्ह्यात वाद निर्माण करणे, हे भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व आहे, अशी टिकाही त्यांनी केली. केंद्र व राज्य सरकारचा कारभार आणि आमदार अपात्रतेसंदर्भात विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या चुकीच्या निर्णयाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सभा रविवारी पिंपरीत झाली. त्यात युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे बोलत होते. तत्पुर्वी निगडी येथील भक्तीशक्ती चौकात त्यांचे स्वागत केले. तेथून पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत दुचाकी फेरी काढली. तिथे झालेल्या सभेस जिल्हा संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन अहिर, राज्य संघटक गोविंद घोळवे, एकनाथ पवार, मावळ लोकसभा मतदारसंघ संघटक संजोग वाघेरे, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे आदी उपस्थित होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या हातात, 'ईव्हीम हटाव, संविधान बचाव' असा फलक होता. त्याला उद्देशून ठाकरे म्हणाले, ''ईव्हीएमपेक्षाही खोके सरकारपासून महाराष्ट्र बचाव, असा नारा लावायची वेळ आलेली आहे. दोन पक्ष व एक कुटुंब फोडून अवकाळी सरकार आमच्या डोक्यावर बसवलं आहे. चाळीस चोरींची ही टोळी आहे. त्यांचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री घटनाबाह्य आहेत. पण, सध्याचे वर्ष निवडणुकांचे असून आमचे आहे. पुढील दोन महिन्यांनी लोकसभेची निवडणूक होईल, कदाचित विधानसभेचही निवडणूक होईल. त्यानंतर आमचे सरकार येणार आहे. त्यावेळी घोटाळेबाज मंत्र्यांना अगोदर जेलमध्ये टाकू,'' असा इशारा देत, मुख्यमंत्र्यांमध्ये हिम्मत असेल तर, त्यांनी राज्यहिताचा निर्णय घेऊन दाखवावा, असे आव्हानही आदित्य ठाकरे यांनी दिले. सुलभा उभाळे, गोविंद घोळवे यांचीही भाषणे झाली. काही कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला, त्यांचे स्वागत ठाकरे यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष तथा माजी महापौर संजोग वाघेरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात गेल्या महिन्यात प्रवेश केला आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातून ' हे थांबविण्यासाठी आणि दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज बुलंद करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जागेवर महाविकास आघाडी जिंकणं महत्त्वाचं आहे. आमची स्थानिक टीम शहरात चांगले काम करीत आहे. शहरात नागरीकरण वाढत आहे. देशभरातून लोक इथे आले आहेत. एक चांगलं शहर पिंपरी-चिंचवड होऊ शकते. आमच्या सरकारने शहरांच्या विकासावर भर दिला होता. पुढील पन्नास वर्षांचा विचार करून शाश्वत विकास साधला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे.'' उद्योगमंत्री उदय सामंत यांना त्यांच्या खात्याविषयीच फारसी माहिती नाही, अशी टिका करत 'इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सर्व विभागांची सांगड घालणं गरजेचे असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. ते म्हणाले. ''अयोध्येत आम्ही नंतर जाणार आहेत.




### त्यांना उमेदवारी मिळणार का?

» असे सभा संपल्यानंतर पत्रकारांनी विचारले असता, आदित्य ठाकरे म्हणाले, ''संजोग वाघेरे यांनी संघटक म्हणून जबाबदारी घेतलेली आहे. लोकसभा वा विधानसभेच्या उमेदवारीबाबत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि वरिष्ठ नेते घेत असतात. तिकिट वाटपात मी जात नाही. पण, केवळ मावळच नाही तर, राज्यातील प्रत्येक लोकसभा व विधानसभा मतदारसंघ आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. गेल्या दोन वर्षात खूप अन्याय महाराष्ट्र सहन करत आहे. आमच्या हक्काचा रोजगार असलेला प्रत्येक उद्योग परराज्यात पाठविला जात आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक क्षेत्र कोलमडलं आहे. मुख्यमंत्री अकार्यक्षम आहेत. त्यांच्यावर उद्योजकांचा विश्वास नसावा, त्यामुळे ते अन्य राज्यात जात असावेत.

# भगवे झेंडे, पताका उभारून प्रभू श्रीराम नामाचा जयघोष

## सोसायट्यांचा उत्सवासाठी मोठा सहभाग

**मोशी**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
परिसरात सोमवारी (दि.२२) धार्मिक कार्यक्रमांबरोबरच मिरवणूका आणि घरांवर गुढ्या, , दुचाकी रॅली, पारंपारिक वाद्यवृंद, भगवे झेंडे, पताका उभारून प्रभू श्रीराम नामाचा जयघोष होणार आहे. अनेक ठिकाणी दीपोत्सव, रांगोळीच्या फुलांच्या पायघड्या, फायर शो, लेझर शो, पुष्पवृष्टी, महाप्रसाद अशे विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. परिसरातील सोसायट्यांनीही या कार्यक्रमासाठी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला आहे. त्यामुळे परिसर राममय झाला आहे. मोशी, जाधववाडी,



मोशी प्राधिकरणातील मंदीरामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. मोशी ग्रामस्थांनी श्री नागेश्वरमहाराज मंदीर, भैरवनाथ मंदीर, मारूती मंदीर या ठिकाणी विविध धार्मिक उपक्रम आयोजित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक मोशी गावठाण,एक हजार महिलांच्या हस्ते आरती सायंकाळी होणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे यांनी सांगितले. जाधववाडीतील रामायण मैदानामध्ये आरती, महाप्रसाद, विविध सोसायट्यांमध्ये महाप्रसादांचे नियोजन, विठ्ठल रूक्मिणी मंदीरामध्ये भजन, काकडा आरती, महाप्रसाद श्री स्वामी समर्थ मंदीरात होमहवन, महाप्रसाद असे नियोजन केले असल्याची माहिती माजी महापौर राहूल जाधव यांनी दिली.

# पर्यावरण संदर्भातील एनओसी मिळाल्यास मोशी न्यायालयाचे भूमिपूजन फेब्रुवारी महिन्यात

## फक्त पर्यावरण संदर्भात परवानग्या मिळणे बाकी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मोशी येथे होणाऱ्या न्याय संकुलासाठी सर्व वभागांच्या परवानग्या मिळाल्या असून पर्यावरण विभागाची परवानगी बाकी आहे. ही परवानगी मिळाल्यास पिंपरी चिंचवड न्यायालयाच्या मोशी येथील इमारतीचे भूमिपूजन फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. पुणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे पोक्सो न्यायालयाच्या इमारतीचा कोनशिला, तसेच भूमिपूजन समारंभ न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या हस्ते तसेच न्यायमूर्ती संदीप मारणे व न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने मोरवाडी येथील जुन्या न्यायालयाच्या इमारती मध्ये दोन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय आणि दोन दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर न्यायालय लवकर सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली.पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने प्रत्यक्ष भेटून न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आली.



तसेच मोशी येथे होणाऱ्या न्यायसंकुलाचे भूमिपूजन सुद्धा लवकर करावे अशी मागणी करण्यात आली. त्याबाबत बोलताना न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी मोशी येथे होणाऱ्या न्यायसंकुलासाठी गरजेच्या सर्वच परवानग्या मिळाल्या आहेत. फक्त पर्यावरण संदर्भात परवानग्या मिळणे बाकी आहे. ते देखील लवरच मिळेल असे सांगितले.या प्रसंगी पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. रामराजे भोसले, महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. अतिश लांडगे, सचिव अॅड. धनंजय कोकणे, सह सचिव अॅड. उमेश खंदारे, सदस्य अॅड. मंगेश खराबे, अॅड. मानसी उदासी, अॅड. बालाजी देशमुख, अॅड. विवेक राऊत, अॅड. शुभम खैरनार उपस्थितीत होते. मोशी येथील न्याय संकुलाच्या इमारतीच्या कामासाठी केवळ पर्यावरण विभागाची परवानगी बाकी आहे. ती येत्या काही दिवसात मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे फेब्रुवारी महिन्यात न्यायालयाच्या कामाचे भूमिपूजन होईल असे म्हटले जात आहे.पुणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे पोक्सो न्यायालयाच्या इमारतीचा कोनशिला, तसेच भूमिपूजन समारंभ न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या हस्ते तसेच न्यायमूर्ती संदीप मारणे व न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने मोरवाडी येथील जुन्या न्यायालयाच्या इमारती मध्ये दोन अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय आणि दोन दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर न्यायालय लवकर सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली.पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स बार अससोसिएशनच्या वतीने प्रत्यक्ष भेटून न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आली.

# पर्यावरणपूरक 'ईव्ही' धोरणाला चालना महापालिकेचे नियोजन

## शहरात २२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन विचाराधीन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहरातील हवा व ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांकडे (ईव्ही) नागरिकांनी वळावे, यासाठी शहरातील २२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचे नियोजन केले आहे. खासगी एजन्सीद्वारे ही स्टेशन उभारण्यात येणार आहेत. हवा व ध्वनी प्रदूषण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महापालिकेने ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी तीन वेळा निविदा प्रक्रिया राबवली आहे. मात्र, त्यास हवा तसा, प्रतिसाद मिळालेला नाही. त्याला चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी अटी-शर्तीत बदल करून पुन्हा निविदा काढण्याचे नियोजन आहे. दरम्यान, शहरात सुमारे ३० हजार ई-वाहने असल्याची पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंद आहे. ती वापरणाऱ्यांसाठी चार्जिंग स्टेशन उपलब्ध करून दिली जाणार आहेत. अशी २२ ठिकाणे निश्चित केली आहेत. खासगी एजन्सींकडून 'बांधा आणि संचलित करा' (बिल्ड ऑपरेट अँड ओन) तत्त्वानुसार चार्जिंग सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. महापालिकेकडून जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. संभाव्य ईव्ही चार्जिंग ठिकाणे महापालिकेने २२ ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात, पिंपरीतील सीट्रस हॉटेलजवळ, दुर्गादेवी टेकडी निगडी, वाहतूकनगरी, मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडिअम नेहरूनगर, निसर्ग निर्माण सोसायटी (रिलायन्स मार्टजवळ) कोकणे चौक पिंपळे सौदागर, आरटीओ कार्यालय चिखली, बर्ड व्हॅली संभाजीनगर, आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल भोसरी, मलनि:सारण केंद्र चिखली, नाशिक महामार्ग लांडेवाडी टेल्को रोड जंक्शन, भक्तीशक्ती बस टर्मिनल निगडी, बजाज ऑटोजवळ आकुर्डी, एच. ए. कंपनी भुयारी मार्गाजवळ पिंपरी, संत तुकारामनगर मेट्रो स्टेशनच्या चौथ्या प्रवेशद्वाराजवळ, पी. के. चौक पिंपळे सौदागर, योगा पार्क पिंपळे सौदागर, राजमाता जिजामाता उद्यान पार्किंग प्रभातनगर पिंपळे गुरव, उद्यान कासारवाडी, बी. डी. किल्लेदार गार्डन वल्लभनगर, ऑटो क्लस्टर सायन्स पार्क, राजश्री शाहू गार्डन आदी ठिकाणी ईव्ही चार्जिंगसाठी महापालिकेने जागा निश्चित केल्या आहेत.

# राजकारण लोकांच्या भल्यासाठी करा!

## चौफुला, टेंभुर्णीला जाऊन तिथं उधळपट्टी करू नका : पवार

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे या धनकवडी येथील एका कार्यक्रमास आल्या होत्या. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी भाजप नेत्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांच्या भाषणामधून चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले. यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सत्ता काय असते, मी ते आयुष्य अगदी जवळून पाहिलं आहे. सत्तेचं एकच कारण आहे. ते म्हणजे तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवणं, त्यामुळे सत्तेमधील आमदार, खासदार आणि आम्ही बघा, अशा शब्दांत सत्ताधारी पक्षांवर त्यांनी टीका केली. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, माझे वडील फार म्हणजे फार कमी बोलतात आणि ते कोणालाही सल्ला देण्यास जात नाही. पण माझ्या वडिलांची बदनामी करण्यासाठी अदृश्य शक्ती त्यांच्या मागे लागली आहे. मला ती अदृश्य शक्ती माहिती नाही. पण





मुख्यमंत्री सतत म्हणतात की,अदृश्य शक्ती महाराष्ट्र चालवते, त्यामुळे मी विचार करायला लागल्यावर अनेक प्रश्न निर्माण झाले. तांत्रिक मांत्रिक असेल किंवा वेगळी कोणती ऊर्जा आहे का? असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपच्या नेत्यांवर सुळे यांनी टीका केली.तसेच त्या पुढे म्हणाल्या की, राजकारण जरुर करावे, आता मला एक सांगा की, परवा आमच्या रोहितला ईडी मार्फत नोटीस आली. त्यामुळे तुमच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे, असा सवाल उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांना विचारत, त्या पुढे म्हणाल्या की, तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवण्यासाठी सत्ता असते. त्यामुळे जर मी अदृश्य शक्तीच्या जागी असते. तर मी ईडी, सीबीआय या भानगडीत पडले नसते आणि गॅसचे दर कमी केले असते अशा शब्दांत पुन्हा एकदा भाजप नेत्यांवर त्यांनी टीका केली.तुमची ही लेक संघर्षाला कधीही घाबरत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख दुःख असतात. त्यामुळे नेहमी म्हणतात ना, प्रत्येकाच्या घरी मातीच्याच चुली ना, त्यामुळे संघर्षात एक वेगळीच मजा असते. आता कोर्टात प्रकरण गेल्याने और लढेंगे, ही एक वेगळीच गंमत असून तत्व, आदर आणि प्रेमाची ही लढाई आहे. ही लढाई काही वैयक्तिक नाही. माझ्या आईचे एक संस्कार आहेत. आपण कोणाच्याही एका ताटात जेवण केले असेल ना, त्याच्या विरोधात कधीच बोलायाचे नाही. अयोध्येत प्रभू श्रीराम यांच्या भव्य दिव्य अशा मंदिराचं उद्घाटन उद्या २२ जानेवारी रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. त्याच दरम्यान पुण्यातील एका कार्यक्रमात सुप्रिया सुळे भाषण करतेवेळी म्हणाल्या की आता ते जय श्रीराम म्हणतात, पण सुषमा स्वराज या नेहमी मर्यादा पुरुषोत्तम राम म्हणत असायच्या. त्यामुळे

### आदर आणि प्रेमाची ही लढाई

» राजकारण जरुर करावे, ते देखील मुद्देसुद करावे आणि ते राजकारण लोकांच्या भल्यासाठी करावे. आता मला एक सांगा की, परवा आमच्या रोहितला ईडी मार्फत नोटीस आली. त्यामुळे तुमच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे, असा सवाल उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांना विचारत, त्या पुढे म्हणाल्या की, तुमच्या आयुष्यात चांगला बदल घडवण्यासाठी सत्ता असते. त्यामुळे जर मी अदृश्य शक्तीच्या जागी असते. तर मी ईडी, सीबीआय या भानगडीत पडले नसते आणि गॅसचे दर कमी केले असते अशा शब्दांत पुन्हा एकदा भाजप नेत्यांवर त्यांनी टीका केली.तुमची ही लेक संघर्षाला कधीही घाबरत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख दुःख असतात. त्यामुळे नेहमी म्हणतात ना, प्रत्येकाच्या घरी मातीच्याच चुली ना, त्यामुळे संघर्षात एक वेगळीच मजा असते.

ते आता जरी जय श्रीराम म्हणत असले तरी आम्ही महिला ‘मर्यादा पुरुषोत्तम राम’च म्हणू.सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, आम्ही मर्यादेत राहूनच राजकारण आणि समाजकारण करू. प्रभू श्रीराम यांच्यामध्ये जेवढे गुण आहेत. ते सर्व गुण आपल्यामध्ये येऊ शकत नाही. आपण अनेक चुका करतोच, पण त्यांचे गुण जेवढे आत्मसात करता येतील, त्यासाठी प्रयत्न करुयात, असे आवाहन उपस्थित नागरिकांना सुप्रिया सुळे यांनी केले.बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे या धनकवडी येथील एका कार्यक्रमास आल्या होत्या. त्यावेळी सुप्रिया सुळे यांनी भाजप नेत्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांच्या भाषणामधून चांगलाच समाचार घेतल्याचे पाहण्यास मिळाले.

# आम्ही आज अयोध्येला जाणार होतो : अजित पवार

## अजित पवारांनी सांगितलं प्राणप्रतिष्ठेला न जाण्याचं कारण

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** अयोध्येत नव्याने बांधल्या जात असलेल्या मंदिरात सोमवारी श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. देशभर सध्या या सोहळ्याची चर्चा आहे. या दिवशी श्री रामजन्मभूमी ट्रस्टने अयोध्येत मोठ्या उत्सवाचं आयोजन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष मोहन भागवत या तिघांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडेल. या उत्सवाचं अनेकांना निमंत्रण पाठवलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, मोठे नेते, राम मंदिरासाठी आंदोलन करणारे कारसेवक, खेळाडू, कलाकार आणि साधू-संतांसह तब्बल ७,००० हून अधिक लोकांना या उत्सवाचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. अयोध्येत या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी चालू आहे. सोमवारी दुपारी १२.१५ ते १२.४५ दरम्यान मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे.



रामजन्मभूमी ट्रस्टने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना (देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार) या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं आहे. परंतु, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या सोहळ्याला जाणार नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबतची माहिती दिली. अजित पवार यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आपल्या राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. देशातल्या इतर काही राज्यांनी अर्धा दिवस सुट्टी जाहीर केली आहे.अजित पवार म्हणाले, राज्यातल्या शासकीय इमारतींमध्ये रोषणाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणारे रामभक्त त्यांच्या इच्छेप्रमाणे आणि तिथल्या पद्धतीप्रमाणे कार्यक्रम करणार आहेत. अनेक कार्यालयांमध्ये अशा कार्यक्रमांची तयारी करण्यात आली आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाणार का? या प्रश्नावर उत्तर देताना अजित पवार म्हणाले, मला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या सोहळ्याचं निमंत्रण पाठवण्यात आलं आहे. खरंतर, मी आणि मुख्यमंत्री आजच या कार्यक्रमासाठी अयोध्येला जाणार होतो. ‘आपल्याला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं आमंत्रण आहे. मात्र उद्या या कार्यक्रमाला केवळ आपण दोघेच न जाता काही दिवसांनी आपलं संपूर्ण मंत्रिमंडळ घेऊन अयोध्येला जाऊया. आपण एक तारीख ठरवू आणि त्या दिवशी अयोध्या दौरा करू.

# दौंड तालुक्यात रिचवला जातोय पुण्याचा कचरा

## रुबी हॉल ते रामवाडी या मार्गाचे काम झाले पूर्ण



### कचर्‍याचे व्यवस्थापन व्यवस्थित करावे

» ठेकेदाराने कचर्‍याचे व्यवस्थापन व्यवस्थित करावे यासाठी ठेका देतानाच कचरा निर्मूलन विषयावर पालिकेकडे तक्रार यायला नको अशी तंबी दिलेली असते, असे समजते यामुळे ठेकेदाराने कचरा उचलून निर्मूलन करण्याची नामी युक्ती शोधलेली आहे. ग्रामीण भागात कचरा खत म्हणून पाठवण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. दौंड तालुका या ठेकेदाराचे सावज झाला असून रोज तालुक्यात कमीत कमी दहा गाड्या हायवा, आणि जास्तीत जास्त २० गाड्या येऊन खाली केल्या जात आहेत.

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे शहरातील कचर्‍याची विल्हेवाट दौंड तालुक्यात लावण्याचा सपाटा पुणे महापालिकेच्या कचरा ठेकेदाराने लावला आहे. दौंड तालुक्यातील राज्यभर प्रसिद्ध असलेल्या नारायण महाराज बेट परिसरासह अंजीरासाठी प्रसिद्ध असलेल्या खोर गावात आणि नजीकच्या भांडगाव, तांबेवाडी, पडवी, सहजपूर, कासुर्डी या गावात दिवसाकाठी जवळपास दहाहून अधिक हायवा ट्रक हा कचरा रिचवला जात आहे.पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापनाची सोय दौंड तालुक्यात करण्यात आलेली आहे का? असा प्रश्न यामुळे पडला आहे. हा सर्व प्रकार शेतकर्‍याला सेंद्रीय खत देतोय या गोंडस नावाने सुरू असला तरी काही अपवाद वगळता पालिका कचरा ठेकेदाराने कमिशनवर नेमलेले स्थानिक दलाला शेतकर्‍यांच्या नावाखाली हा कचरा रिचवत आहेत. पालिकेच्या कचर्‍याचे निर्मूलन यामुळे होऊन ठेकेदाराची सुटका होईल. मात्र, दौंड तालुक्यातील काही गावे पुण्याच्या कचर्‍याचे माहेरघर बनण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पुणे शहरातील कचरा, घन कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अनेक वर्षे वादाचा विषय ठरला आहे. कचर्‍याचे निर्मूलन करण्यासाठी ठेकेदारी पद्धत पुढे आली. ठेकेदाराने कचर्‍याचे व्यवस्थापन व्यवस्थित करावे यासाठी ठेका देतानाच कचरा निर्मूलन विषयावर पालिकेकडे तक्रार यायला नको अशी तंबी दिलेली असते, असे समजते यामुळे ठेकेदाराने कचरा उचलून निर्मूलन करण्याची नामी युक्ती शोधलेली आहे. ग्रामीण भागात कचरा खत म्हणून पाठवण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. दौंड तालुका या ठेकेदाराचे सावज झाला असून रोज तालुक्यात कमीत कमी दहा गाड्या हायवा, आणि जास्तीत जास्त २० गाड्या येऊन खाली केल्या जात आहेत. अतिशय उग्र दुर्गंधी असलेली घाण या गाड्यातून पुणे- सोलापूर महामार्गाने जवळपास ३० किलोमीटर अंतर पार करून येत आहेत. महामार्गावरून जाणार्‍या वाहनांनाही याचा प्रचंड त्रास होतो आहे. दौंड तालुक्यातील काही गावांना हा त्रास सुरू झाला आहे. त्रास झालेल्यांनी आवाज उठविण्याचा प्रयत्न केल्यास ठेकेदाराचे दलाल गावात भांडणाचा विषय करत आहेत. कचर्‍याचा त्रास वरून भांडण यामुळे कोणी तक्रारसुद्धा करत नाही. तालुक्यात अशाच पद्धतीने शेकडो टन कचरा खाली होईल, याचा परिणाम नागरी जीवनावर होणार आहे. उग्र वासाने आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, याला गांभीयाने घेणे गरजचे असले तरी स्थानिक ग्रामपंचायती अजून झोपलेल्या आहेत्‌ पुणे शहरातील कचरा, घन कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अनेक वर्षे वादाचा विषय ठरला आहे. कचर्‍याचे निर्मूलन करण्यासाठी ठेकेदारी पद्धत पुढे आली. ठेकेदाराने कचर्‍याचे व्यवस्थापन व्यवस्थित करावे यासाठी ठेका देतानाच कचरा निर्मूलन विषयावर पालिकेकडे तक्रार यायला नको अशी तंबी दिलेली असते, असे समजते यामुळे ठेकेदाराने कचरा उचलून निर्मूलन करण्याची नामी युक्ती शोधलेली आहे. पुणे शहरातील कचर्‍याची विल्हेवाट दौंड तालुक्यात लावण्याचा सपाटा पुणे महापालिकेच्या कचरा ठेकेदाराने लावला आहे. दौंड तालुक्यातील राज्यभर प्रसिद्ध असलेल्या नारायण महाराज बेट परिसरासह अंजीरासाठी प्रसिद्ध असलेल्या खोर गावात आणि नजीकच्या भांडगाव, तांबेवाडी, पडवी, सहजपूर, कासुर्डी या गावात दिवसाकाठी जवळपास दहाहून अधिक हायवा ट्रक हा कचरा रिचवला जात आहे.

# नदी संवर्धनासाठी ‘नद्यांचे हक्क, माझी जबाबदारी’ मोहीम

## ७ नद्यांच्या काठावर ही मोहीम राबवली जाणार



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

नदी प्रश्नांसंबंधी सरकार व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये जागृती व्हावी, या उद्देशाने ६० हून अधिक सामाजिक संस्थांनी ‘राइट्स ऑफ रिव्हर्स’ या उपक्रमाचे आयोजन केले आहे. भीमा खोर्‍यातील मुळा, मुठा, रामनदी, पवना, इंद्रायणी, भामा व भीमा या ७ नद्यांच्या काठावर ही मोहीम राबवली जाणार आहे.

या मोहिमेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ परिणिता दांडेकर यांच्या हस्ते प्रजासत्ताकदिनी (ता. २६) दुपारी ४ ते ६ या वेळेत बंडगार्डन येथे उद्घाटन होणार आहे. २६ ते २८ जानेवारी असे तीन दिवस ही मोहीम चालणार असून, यात नदी काठावर स्वच्छता, ‘सेल्फी विथ नदी’ यासारखे उपक्रम होणार असल्याची माहिती, शैलजा देशपांडे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

पुण्यातील ७० टक्के प्रदूषित सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जाते. त्यामुळे नद्यांचे आरोग्य धोक्यात आले असून, नदी संवर्धन होणे आवश्यक आहे. मोहिमेच्या दुसर्‍या दिवशी सातही नद्यांच्या काठावर सकाळी ९ वाजता साखळी उपोषणाला सुरुवात होणार आहे. समारोपाच्या दिवशी सकाळी ११ ते १ या वेळेत भारताचे ‘वॉटरमॅन’ म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंग हे मार्गदर्शन करणार आहेत. या मोहिमेत जीवितनदी, एन.ए.पी.एम., जलबिरादरी, जलदिंडी प्रतिष्ठान, नमामि इंद्रायणी प्रतिष्ठान, श्री आळंदी धाम सेवा समिती, सजग नागरिक मंच यांच्यासह विविध सामाजिक संस्था सहभागी होणार आहेत. यावेळी संतोष ललवाणी, ओंकार गौरीधर, विवेक वेलणकर, अर्जुन मेदनकर आदी उपस्थित होते.